पुढील उलटतपास वादी नं.१ यांचा प्रतिवादी नं.३तर्फे विधीज्ञ श्री. पी.एस. रानडे यांचेमार्फत शपथेवर सुरु—

१९. प्रतिवादी क्र.४ यांचा भाऊ अरुण व त्यांच्या तीन बहीणी यांचा दावा मिळकतींमध्ये हक्क व अधिकार आहे. दावा मिळकतींमध्ये सुधारणा करुन हापूस आंबा कलमांची लागवड केली, त्याव्यतिरिक्त अन्य कलमांची लागवड केली नाही. या कलम लागवडींसाठी एकूण किती रुपये खर्च झाला हे मी सांगू शकणार नाही. आबाजी साबाजी तावडे यांच्या पाच शाखांपैकी प्रत्येक शाखेने किती खर्च केला हे मी सांगू शकत नाही. आबाजी साबाजी तावडे यांच्या पाच शाखांच्या प्रतिनिधींची नावे दावा मिळकतीच्या उता—यास नोंदली आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या हिश्श्याचे क्षेत्र विक्री केल्याबाबतची माहीती मला कधी कळाली याबाबतचा उल्लेख मी दाव्यात केला आहे. मला सदरची माहीती ६ ऑक्टोबर सन २०१० इ. रोजी मिळाली. दि.६/१०/२०१० पूर्वी किती दिवस आधी हा खरेदी व्यवहार झाला याची मला माहीती नाही. दावा दाखल करण्यापूर्वी किती दिवस आधी मला ही माहीती मिळाली हे मी सांगू शकत नाही. प्रतिवादी क्र.१ ते ३ यानी त्यांच्या हिश्श्याच्या केलेल्या खरेदीपत्रासंबंधात मी हा दावा दांखल केला आहे. खरेदीपत्र झाल्यानंतर मी प्रतिवादी क्र.१ ते ३ पैकी कोणाची तरी भेट घेतली होती. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची भेट होण्यापूर्वी मी या खरेदीपत्राची सहीशिक्क्याची प्रत घेतली होती. खरेदीव्यवहार किती मोबदला रक्कमेस झाला याची माहीती मी घेतली होती. रुपये साठ लाख किंमतीस खरेदी व्यवहार झाला होता. खरेदीपत्र वाचल्यानंतर चार ते पाच दिवसांनी मी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना भेटलो. दावा मिळकतींची विभागणी झाली नव्हती, आम्ही दावा मिळकतींमध्ये लागवड केली होती, त्यांनी त्रयस्थ व्यक्तीला विक्री केली होती, त्यामुळे मी त्यांना भेटलो होतो. दावा मिळकतीमध्ये लागवड करण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ ते ३ किंवा त्यांचे पूर्वाधिकारी यांची परवानगी मी घेतली होती. नोव्हेंबर १९७४ मध्ये मी सदर परवानगी घेतली होती. साक्षीदार पून्हा सांगतो की, नोव्हेंबर १९७३ मध्ये मी अशी परवानगी घेतली होती. ज्यावेळी कलम लागवड केली गेली, त्यावेळी शंकर परशुराम यांचे नाव उता—यास नोंदले नव्हते. ज्यावेळी लागवड केली गेली, त्यावेळी परशुराम आबाजी

तावडे यांचे नाव उता—यास नोंद होते. परशुराम आबाजी तावडे यांचा दावा मिळकतींमध्ये पाचवा हिस्सा होता. परशुराम यांच्या शाखेचा पाचवा हिस्सा न्यायालयाद्वारे अगर खाजगी रित्या वेगळा, वाटप केला नव्हता.

२०. विजय शंकर तावडे यांना मी पाहीले होते. मी त्यांना दोन ते तीन वेळा पाहीले होते. ते कायम आजारी असायचे याची मला माहीती नाही. विजय तावडे हे मृत्यूपूर्वी सुमारे सात ते आठ वर्ष विविध रुग्णालयात ॲडमीट असायचे याची मला माहीती नाही. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे एकत्र राहायचे याची मला माहीती नाही. शंकर परशुराम तावडे हे चालक म्हणून नोकरी करीत होते याची मला माहीती नाही. ते आरटीओ कार्यालयामध्ये काम करत होते याची मला माहीती नाही. दिनांक ६/१२/२०१० इ. रोजी किती खरेदीपत्र झाली हे मी सांगू शकत नाही. प्रतिवादी क्र.२ हिचे बनावट मुखत्यारपत्र तयार केल्याबाबत तिनेच आम्हाला माहीती दिली. तिने सदरची माहीती दाव्यापूर्वी दिली होती की त्यानंतर हे मला आठवत नाही. असा बनावट मुखत्यारपत्राचा लेख मी पाहीला होता. तो मी कधी पाहीला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सन १९७५ पासून कलमांची लागवड केल्याबाबत खोटे नमूद केले आहे. आबाजी साबाजी तावडे यांच्या पाच शाखेंच्या प्रत्येक शाखेकडे अंदाजे किती क्षेत्र वहीवाटीस होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्वखर्चाने कलम लागवड केल्याबाबतचा मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाडा येथील घर मिळकतींमध्ये देवघर हे आज देखील सामाईकच आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे त्यांच्या आजोबांच्या वेळेपासून त्यांच्या सवडीनुसार दावा मिळकतीमध्ये येवून जावून वहीवाट करत होते व आहे. आबाजी साबाजी यांच्या पाचही शाखांचे वारस मुंबईला नोकरी व्यवसाय करीत होते. सन १९५५ ते १९९३ या काळात मी मुंबई येथे नोकरी केली. आबाजी साबाजी यांच्या पाचही शाखांच्या वारसांनी आपापल्या काळात मुंबई येथे नोकरी केली. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अनिल तावडे याचा मोठा भाउ गावीच असायचा. आबाजी साबाजी यांच्या उत्तराधिका—यांपैकी शंकर परशुराम तावडे व्यतिरिक्त इतर सर्वजण गावी येवून जावून करत होते. हे म्हणणे खरे नाही की, शंकर तावडे याच्या शाखेचे वारस देखील गावी येवून जावून करत होते. शंकर

तावडे यांच्याशी उर्वरीत चार शाखांच्या हक्कदारांचे मतभेद झाले नव्हते. शंकर तावडे यांच्या हयातीत मुंबई येथे माझे त्यांच्याकडे केव्हातरी जाणेयेणे होते. आबाजी साबाजी तावडे यांच्या सर्व वारसांचा आज देखील एकच गणपती बसवला जातो. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे गावी येणे नसल्याबद्दल व त्यांची दावा मिळकतीत वहीवाट नसल्याबद्दलची माझी विधाने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आबाजी साबाजी तावडे यांच्या सर्व वारसांना याकामी पक्षकार केलेले नाहीत.

२१. आबाजी साबाजी तावडे यांचा मृत्यू जुलै सन १९७४ मध्ये झाला. त्यांच्या वारसांची नावे सन १९९४ साली दावा मिळकतींना नोंद झाली. त्याबाबतची मागणी कोणीच केली नव्हती. आबाजी साबाजी तावडे यांच्या पाच मुलांची जमीनींचे खाते नव्हते. आबाजीच्या पश्चात त्याच्या पाचही मुलांच्या नावे खाते नोंदले गेले. आबाजी यांचा वारस तपास झाला त्यावेळी दावा मिळकती व्यतिरिक्त अन्य मिळकतींबाबत वारस तपास झाला होता याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींमध्ये झालेल्या सुधारणा आबाजींच्या सर्व वारसांच्या वतीने व त्यांच्यासाठी एकत्र कुटूंबाच्या खर्चाने झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये सर्व तावडे कुटूंबियांसहीत प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची कब्जेवहीवाट होती व आहे. आबाजीच्या पाच शाखांपैकी केवळ चारच शाखांनी दावा मिळकतीमध्ये सुधारणा केल्या याबाबतचा लेखी पुरावा आहे. असा पुरावा याकामी हजर केला नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

२५/१०/१७

दिनांक—२५/१०/२०१७

दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)
देवगड.